ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ११ · पुणें, बुधवार तारीख २९ जून, १९५५ · अंक २६

## विविध माहिती

**महारोगावरील उपचाराचें केंद्र**—गांधी–स्मारक–निधी-फंडाचे चिटणीस व मुंबई राज्याचे महसूलमंत्री श्री. हिरे, ह्यांनीं नाशिक जिल्ह्यांतील मालेगांव ह्या गांवीं महारोगावर उपचार करणाऱ्या एका केंद्राचें उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना त्यांनीं अशी सूचना केली कीं, प्रत्येक बाबतींत सरकारकडे पहाण्याची संवय लोकांनीं सोडून द्यावी.

**रशिआंतील शिक्षणपद्धति**—भारतीय पार्लमेंटच्या सभासदांचें एक प्रतिनिधीमंडळ रशिआ व युगोस्लाव्हिआ ह्या देशांचा दौरा करून नुकतेच परत आलें. प्रतिनिधीमंडळाचे नेते श्री. कृष्णमूर्तीराव ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, रशिआच्या शिक्षणपद्धतींत धंदेशिक्षणावर आणि शारीरिक विकासावर अधिक भर देण्यांत येतो.

**लँड मॉर्टगेज बँकेचें कार्य**—राजकोट येथील लँड मॉर्टगेज बँकेनें जमिनींची सुधारणा करण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जें देण्याचें कार्य चालूं केलें आहे. आतांपर्यंत सुमारें १५ लाख रुपयांची रक्कम अशा रीतीनें कर्जाऊ देण्यांत आली आहे. जमीन–धारणा-विषयक सुधारणाच्या कार्यांतहि बँकेनें ६५,००० कुळांना मिळून २॥ कोटी रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत.

**हत्तीकडून जमिनीची नांगरट**— उत्तर–प्रदेश सरकारनें जमिनीच्या नांगरटीसाठी हत्तींचा उपयोग करून घेण्याची योजना आखली आहे. जमीन नांगरण्यासाठी बैलांचा अगर ट्रॅक्टरचा उपयोग करण्यापेक्षा हत्तींचा उपयोग स्वस्त पडतो, असें आढळून आलें आहे. ह्या नांगरणीसाठी विशेष प्रकारचा नांगर व इतर सरंजाम तयार करण्यांत आला आहे.

**भिलई येथील कारखान्याची यंत्रसामुग्री**— पं. नेहरूंनीं आपल्या रशिआच्या दौऱ्यांत स्वर्डलॉव्हस्क येथील यंत्रसामुग्री तयार करण्याचा प्रचंड कारखाना पाहिला. ह्याच कारखान्यांत भारतांत रशिआच्या मदतीनें उभारण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्याची यंत्रसामुग्री तयार करण्यांत येणार आहे. सध्यां कारखान्यांत चीनसाठी १० लाख टन वजनाची यंत्रसामुग्री तयार करण्यांत येत आहे.

**बँकेच्या कर्जासाठी हमी**—त्रावणकोर–कोचीन स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेला रिझर्व्ह बँकेनें मध्यम मुदतीचें १० लाख रुपयांचें कर्ज द्यावें म्हणून राज्य सरकार जामीन राहिलें आहे. ही बँक राज्यांतील प्राथमिक शेती–सहकारी संस्थांना व कोचीन को-ऑपरेटिव्ह बँकेला कर्जें देईल. कर्जें ३ वर्षांत परत करण्याच्या बोलीचीं असतील.

**मानसिक दुर्बलतेचे बळी**—ब्रिटनमधील एका मनोव्यापार तज्ज्ञानें असा अंदाज केला आहे कीं, देशांत ३० लाखांपेक्षाहि अधिक लोक भावनात्मक पेंचप्रसंगांत सांपडल्यामुळें मानसिकदृष्ट्या दुर्बळ झालेले आहेत. ब्रिटनमधील मनोविषयक इस्पितळांतून दरवर्षीं सुमारें ७०,००० मानसिक रोग्यांना उपचारासाठी दाखल करून घेण्यांत येतें.

**फ्रान्समधील विमानांचा धंदा**—फ्रान्समध्यें तयार झालेलीं जेट पद्धतीचीं प्रवासी विमानें आणि अत्यंत वेगवान् अशीं लढाऊ विमानें ह्यांच्या उड्डाणाची कवाईत नुकतीच करण्यांत आली. सरळ रेषेंत आवाजापेक्षांहि अधिक गतीनें उड्डाण करणारें विमान प्रथम फ्रान्समध्येंच तयार झालें होतें. ह्या हवाई कवाइतींत अमेरिकन व ब्रिटिश विमानांनींहि भाग घेतला होता.

**वनस्पतीपासून दूध व दही**—म्हैसूर येथील फूड टेक्नॉलॉजिकल रिसर्च इस्टिट्यूटचे डायरेक्टर श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनीं अशी माहिती सांगितलीः—वनस्पतीपासून दूध व दही तयार करण्याची यंत्रसामुग्री अमरावती येथें लवकरच बसविण्यांत येईल. ह्या कारखान्यांत रोज ३,८०० मुलांना पुरेल इतकें दूध व दही रोज तयार करण्यांत येईल.

**सुरतेला ऑटोमॅटिक टेलिफोन एक्सचेंज**—सुरत येथें पोस्ट व टेलिग्राफ खात्याची नवीन इमारत बांधण्यांत येणार असून तींत ऑटोमॅटिक टेलिफोन एक्सचेंजची स्थापना करण्यांत येणार आहे. इमारतींत हवामान सुखकर राखण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. इमारतीचें बांधकाम चालूं आर्थिक वर्षांत सुरू करण्यांत येईल व त्याला सुमारें ८ लाख रुपये खर्च येईल.

**हस्तव्यवसायांतील वस्तूंचें प्रदर्शन**—येत्या ऑक्टोबर महिन्यांत दिल्ली येथें भारतीय उद्योगधंद्यांचें प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनांत ग्रामोद्योगांत तयार झालेल्या नाना प्रकारच्या वस्तुहि मांडण्यांत येणार आहेत. भारतीय ग्रामोद्योगांचें खरेंखुरें दर्शन घडविणारें असें हें प्रदर्शन होईल. अ. भा. ग्रामोद्योग बोर्डानें प्रदर्शनासाठी ४·५ लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे.

**साखरेच्या धंद्यांतील तज्ज्ञांचा मेळावा**—१९५६ च्या जानेवारींत दिल्ली येथें इंटरनॅशनल सोसायटी ऑफ शुगरकेन टेक्नॉलॉजिस्ट ह्या संस्थेची बैठक भरविण्यांत येणार आहे. कॉंग्रेससाठी सुमारें १,००० प्रतिनिधी येतील व त्यांपैकी ५०० भारतामधील असतील. ह्याच प्रसंगीं साखरेच्या कारखान्याच्या अगदीं आधुनिक यंत्रसामुग्रीचें प्रदर्शन उघडण्याचाहि विचार होत आहे.

**भिलई येथील पोलादाचा कारखाना**—मध्य प्रदेशांत भिलई येथें रशिआच्या मदतीनें काढण्यांत येणारा पोलादाचा कारखाना १९५८ सालअखेर उत्पादनास प्रारंभ करील, असा अंदाज रशिअन तज्ज्ञांनीं व्यक्त केला आहे. पुढील वर्षी ५०० भारतीयांना रशिआंत तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यांत येणार आहे

**हैद्राबादला विजेचा पुरवठा**—हैद्राबाद सरकारनें म्हैसूरच्या सरकारकडे जादा विजेचा पुरवठा करण्याची मागणी केली होती, ती म्हैसूर सरकारनें मान्य केली आहे. सध्या हैद्राबादमधील मुनिराबादला म्हैसूर राज्यांतून विजेचा पुरवठा करण्यांत येत आहेच. तुंगभद्रा नदीवरील धरण व वीजकेंद्र पुरें झालें, म्हणजे हैद्राबादला स्वतंत्र पुरवठा होईल.




पुणें शाखा—वेस्टर्न इंडिया हाऊस, लक्ष्मी रोड पुणें शहर [फोन नं. ३४०२]

# अर्थ

बुधवार, ता. २९ जून, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पीक कर्ज योजनेची घाई नको

शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनींच्या तारणाऐवजी त्यांच्या शेतीव्यवसायाच्या तारणावर कर्जे देण्याची योजना अंमलांत आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. ही योजना आखणाऱ्यांना तिचे धोके पूर्णपणें माहीत आहेत व ते धोके टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता व करावयाची पूर्वतयारी ह्याबाबत त्यांनीं सूचना केलेल्या आहेत. तथापि, ज्या गतीनें योजनेच्या यशाचा पाया घातला गेला पाहिजे, ती गति दिसून येत नाहीं आणि कळसाकडे मात्र लक्ष दिलें जात आहे आणि संघटनेचे केंद्रीय भाग निर्माण केले जात आहेत. ह्यासंबंधांत सहकारी चळवळीचे एक तज्ज्ञ कार्यकर्ते व त्या चळवळीचे रिझर्व्ह बँकेच्या लोकल बोर्डावरील प्रतिनिधि, श्री. दा. वा. पोतदार, ह्यांनीं आपले विचार स्पष्टपणें व्यक्त केले आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें, "शेतीच्या कर्जपुरवठ्याची जुनी पद्धत बदलून पुढें येणाऱ्या पिकांसाठी कांहींएक तारण न घेतां "पीक कर्ज" सहकारी संस्थांमार्फत मोठ्या प्रमाणावर देण्याची कल्पना आग्रहानें प्रतिपादली जात आहे. या योजनेसाठी जी पूर्वतयारी होणें अत्यंत जरूर व आवश्यक आहे ती तयारी आज अस्तित्वांत नाहीं; एवढेंच नव्हे तर, ती पूर्वतयारी करण्याची हालचालहि नाहीं आणि अशा पूर्वतयारीच्या अभावींच ही कल्पना देशव्यापी स्वरूपांत अंमलांत आणण्याची घिसाडघाई चाललेली आहे. काँग्रेस सरकार व रिझर्व्ह बँक या सर्वांचें सक्रिय साहाय्य त्या योजनेला मिळणार आहे. या कल्पनेच्या व्यवहारास सुरुवात कांहीं दिवसांपूर्वी मुंबई राज्यांत झाली व मुंबई राज्य सहकारी बँकेनें व तिच्या संलग्न जिल्हा सहकारी बँकांनीं या पद्धतीनें शेतीकर्ज देण्याला सुरुवात केली. दोन चार वर्षांतच व्यवहाराचा पसारा फार मोठा झाला व थकबाकी वसुलींत अडचणीहि येऊं लागल्या. थकबाकीचें प्रमाण वाढूं लागलें. पैशाला मागणी फार मोठ्या प्रमाणावर येऊं लागली आहे. गांठचा पैसा अपुरा पडूं लागला व तरता पैसा ठेवीदारांचे हिताचे दृष्टीनें हातीं ठेवतां ठेवतां बँकांना कष्ट होऊं लागले. शेतीव्यतिरिक्त इतर सहकारी संस्थांना कर्ज देण्याचे बाबतींत क्रम व प्रतवारी ठरविली गेली. प्रथम पतवान (क्रेडिटवर्दी) शेतकऱ्यांनाच फक्त कर्ज देण्याची भाषा होती. आतां शेती हाच कोणी पतीचा व्यवहार (क्रेडिटवर्दी परसूट) असें समजून कर्जें यावीं, अशी भाषा सुरू आहे.

"पूर्वी निदान जमिन किंवा जामीन तारण असे. आतां हंगामाआधीं तारणाशिवाय कर्ज दिलें जाणार. पाऊस पडला नाहीं, हवामान प्रतिकूल झालें, किंमती घसरल्या तर फारच तारांबळ उडणार यांत संशय नाहीं. प्रत्यक्ष अनुभव तसाच आला आहे. अशा वेळीं पूर्वीची थकबाकी असूनहि नव्या हंगामासाठी कर्ज देण्याची स्थिति येणार, असा सर्व व्याप या नव्या योजनेमुळें सहकारी संस्थांच्या अंगावर पडणार आहे.

"पी हळद व हो गोरी" अशा अधीर वृत्तीला व लोकेषणेच्या स्वाभाविक आकर्षणाला बळी पडून या नव्या योजनेचा उदोउदो केला जात आहे व तिच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला हात घातला जात आहे. नवी योजना यशस्वी करण्यासाठी सरकार व रिझर्व्ह बँक यांत सक्रिय भाग घेणार आहे. अर्थात्, सरकारी व रिझर्व्ह बँकेची मदत ज्या प्रमाणांत वाढत जाईल त्या प्रमाणांत व्यवहाराचें नियंत्रणसूत्र त्यांचेकडे जात राहणार याबद्दल कोणी कांहीं म्हटलें तरी संशय नाहीं. स्वावलंबन, स्वयंप्रेरणा, परस्पर परिचय, मितव्यय, या सहकारी तत्त्वांच्या चतुःसूत्रांना दिवसें-दिवस गौण स्थान प्राप्त होऊन, हा व्यवहार सरकारी यंत्रणेतील एक व्यवहार होऊन सहकाराचें फक्त नांवच त्यास राहील अशी साधार भीति वाटते.

"शतकानुशतकें खाजगी सावकारी पाशामुळें दारिद्र्यानें पिचलेल्या अडाणी, परंपरानुगतिक हिंदी शेतकरी समाजाची प्रगति व उन्नति करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न सर्वांकडून होणें जरूर व आवश्यक आहे यांत तिळभर शंका किंवा दुमत नाहीं. पण त्यासाठी करावयाची योजना पूर्वतयारीनें युक्त, विचारपूर्वक व लोकसहकार्यानेंच व्हावयास हव्यात. अनेक शतकांचा हा रोग एकाएकी व थोड्या अवधींत सरकारी ठराव करून किंवा नुसता पैसा ओतून किंवा एकादी पांडित्यप्रचुर योजना एखाद्या अहवालांत मांडून दूर होणार नाहीं. तें काम हलके हलकें व कालावधीनेंच होईल, एरव्ही नाहीं."

श्री. पोतदार ह्यांनीं अत्यंत स्पष्ट शब्दांत व्यक्त केलेल्या साधार भीतीची योग्य त्या ठिकाणीं दखल घेतली जाईल काय? बँकांचा अनुभव लक्षांत घेतला जाईल काय?

---

## कामगारांच्या खर्च करण्याच्या संवयी

भारतीय सरकारच्या लेबर ब्यूरोनें मुंबई पोर्ट ट्रस्टमध्यें काम करणाऱ्या कामगारांच्या पैसे खर्च करण्याच्या संवयी कशा प्रकारच्या आहेत, तें अभ्यासण्यासाठी १९५४ च्या नोव्हेंबरमध्यें एक चौकशी–कमिटी नेमली होती. ह्या चौकशीचा अहवाल आतां जाहीर करण्यांत आला आहे. सामान्यतः अशी समजूत आहे कीं, कामगारांच्या हातीं कांहीं कारणानें एकदम बराच पैसा आला तर ते तो उधळून टाकतात. पण, चौकशींत गोळा झालेल्या माहितीवरून ही प्रचलित समजूत खरी नाहीं, असें आढळून आलें आहे. उलट, कामगार बऱ्याच प्रमाणांत कर्ज-बाजारी असल्याचेंच निदर्शनास आलें आहे. ह्या समजुतीचा खरेखोटेपणा पडताळून पहाण्यासाठी लेबर ब्यूरोनें योग्य अशी वेळ शोधून काढली. पोर्ट ट्रस्टमधील कामगारांनीं केलेल्या जादा कामाचे १ कोटीच्या वर रुपये त्यांना देण्यांत यावयाचे होते. ही रक्कम त्यांच्या हातीं पडल्याची संधि साधून चौकशीस सुरवात करण्यांत आली. चौकशींत असें आढळून आलें कीं मुलाखती घेतलेल्या कामगारांपैकी ७५ टक्के कामगार कर्जबाजारी होते, आणि त्यांनीं दर कामगारामागें सरासरी ५१४ रुपये एवढी रक्कम जादा मिळालेल्या पगारांतून कर्जाची फेड म्हणून दिली.

प्रत्येक कामगाराला जादा कामाचे सरासरी १,००० रुपये मिळाले असें धरलें, तर त्यांपैकी ४२२ रुपये कर्जफेडीसाठी लावलेले दिसून आलें. प्रत्येक कामगारानें आपल्या कुटुंबासाठी सरासरी १७३ रुपये खर्च केल्याचें दिसून आलें. ह्या सरासरीपैकी फक्त २० च रुपये त्यानें केवळ स्वतःसाठी खर्च केले, असें आढळून आलें.

---

## कृत्रिम रबराच्या कारखान्याची जरूरी

इंडिअन रबर इंडस्ट्रीज असोसिएशन, मुंबई ह्या संस्थेच्या कार्यकारी समितीचे सभासद मि. के. एम्. फिलिप ह्यांनीं भारतांत कृत्रिम रबराचा कारखाना काढण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. मि. फिलिप हे मलायाचा व सिंगापूरचा दौरा करून भारतांत परत आले आहेत. भारतामधील रबराच्या कारखान्यांना लागणारें कच्चें रबर तिकडे विकत घेण्याची शक्यता अजमावण्यासाठी त्यांनीं दौरा काढला होता. ह्या विषयासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, भारतांत जितकें कच्चें रबर निर्माण करण्यांत येतें त्यापेक्षा भारताची गरज बरीच अधिक आहे. दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम अमलांत आणण्यास सुरुवात झाली म्हणजे ही गरज अधिकच वाढेल आणि भारताला अधिकाधिक प्रमाणांत रबराच्या आयातीवर अवलंबून रहावें लागेल. १९५४ सालीं भारतांत २१,४९३ टन कच्चें रबर निर्माण करण्यांत आलें. पण रबराचा खप मात्र २५,४८७ टन झाला. उत्पादन व खप ह्यांच्यांतील सुमारें ३,५०० टनांची तफावत रबराची आयात करून भरून काढण्यांत आली. भारतीय सरकारनें असा अंदाज केला आहे कीं, १९६० सालीं देशांत ४०,००० टन रबराचा खप होईल, व उत्पादन मात्र २६,००० टनांच्या आसपास होईल. ह्याचा अर्थ असा कीं, त्यासाठी भारताला १४,००० टन रबर आयात करावें लागेल व त्यासाठी सुमारें ४॥ कोटी रुपये द्यावे लागतील. ही आयात करण्यासाठी भारताला मुख्यतः मलायावर अवलंबून रहावें लागेल. अशा परिस्थितींत कृत्रिम रबर तयार करण्याचा कारखाना काढण्यांत आला, तर आयातीची गरज उरणार नाहीं आणि आपत्तीच्या काळीं रबराचा पुरवठा होण्याची निश्चिति होईल.

---

## सहकारी चळवळीच्या विकासाची योजना

हैदराबाद राज्य-सरकारनें आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सहकारी चळवळीच्या विकासासाठी एक योजना आखून ती अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेंत ग्रामीण भागांतील सहकारी संस्थांवर अधिक भर देण्यांत येणार आहे. योजना अमलांत आणण्यासाठी सुमारें ५ कोटी रुपये खर्च येईल. तिचें क्षेत्र बरेंच व्यापक ठेवण्यांत आलें आहे. सहकारी पतपेढ्यांची स्थापना, सहकारी खरेदी-विक्री संघ, दुधदुभत्यांच्या सहकारी संस्था, जमीन नसलेल्या शेतमजुरांसाठी व मागासलेल्या जातींसाठी सहकारी शेतीची संघटना, शहरांतील राहत्या घरांची टंचाई दूर करण्यासाठी सहकारी संस्थांच्या साह्यानें नवीन घरें बांधणें, शेतमजूर, शेतकरी आणि कामगार ह्यांना जोडधंदा उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामोद्योग व लहान प्रमाणावर चालणारे उद्योगधंदे ह्यांची स्थापना आणि सामाजिक सुखसोयींची व्यवस्था करणाऱ्या सहकारी संघटना, इतक्या विविध प्रकारच्या कार्यासाठी वरील योजना तयार करण्यांत आली आहे. सहकारी संस्थांची ग्रामीण विभागांतील वाढ अधिक कसोशीनें करण्यांत येणार आहे. मध्यम प्रतीचीं कुळें आणि छोटीं कुळें ह्यांची संघटना सहकारी संस्था स्थापून करण्यांत येणार आहे. राज्यांतील सहकारी संस्थांचा विकास घडवून आणण्यासाठी ८० लाख रुपयांचा एक फंड उभारण्यांत येणार आहे. फंडाची रक्कम भारतीय सरकारनें उभारलेल्या नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट फंडांतून राज्य-सरकारला कर्जाऊ मिळणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस हैदराबाद राज्यांत ग्रामीण भागांत कार्य करणाऱ्या ५४४ बँका अस्तित्वांत येतील अशी अपेक्षा आहे.

---

## पश्चिम बंगालमधील मोठें धरण

शेतीसाठी पाण्याचा पुरवठा करणारें पश्चिम बंगालमधील सर्वांत मोठें धरण नुकतेंच पुरें करण्यांत आलें आहे. बिहारमधील संथाळ परगण्यांत उगम पाऊन पश्चिम बंगालमध्यें वहाणाऱ्या मयुराक्षी नदीवर तें बांधण्यांत आलें असून धरणाच्या भिंतीची उंची ११२ फूट आहे. धरणाच्या कामावर आतां अखेरचा हात फिरविण्यांत यत आहे. पाणी अडवणारे दरवाजे कसे काय झाले आहेत त्याची तपासणी झाली असून आतां पाणी अडविण्यास प्रारंभ झाला आहे. ह्या धरणापासून काढण्यांत येणाऱ्या कालव्यांचा प्रारंभ २० मैल खालीं तिलपारा येथें करण्यांत आला आहे. १९५१ च्या जूनमध्येंच कालव्याच्या उगमाचें बांधकाम पुरें करण्यांत आलें. कालव्यांना होणारा पाणी-पुरवठा योग्य तऱ्हेनें वाटण्यांत यावा म्हणून ह्या ठिकाणीं १,०११ फूट लांबीचा एक बंधारा बांधण्यांत आला आहे. सर्व कालव्यांचें काम आतां पूर्ण झालें असून जुलै महिन्यापासून पाण्याचा पुरवठा करण्यास सुरुवात होईल. मयुराक्षी नदीवर बांधण्यांत आलेल्या धरणाच्या पाण्यानें सुमारें १,४०० चौरस मैल सखल प्रदेश भिजेल. ह्या प्रदेशांतील बहुतेक शेतांतून भाताचीच लागवड मुख्यतः करण्यांत येते. धरणावर वीज उत्पन्न करण्यांत येणार आहे. ही वीज पश्चिम बंगालमधील दोन समाजविकास योजनांना आणि बिहारमधील एका योजनेला पुरविण्यांत येईल. त्याशिवाय कांहीं शहरांना व खेडेगांवांनाहि विजेचा पुरवठा करतां येईल. कालव्याचें पाणी ज्या भागांना पोंचूं शकत नाहीं अशा कांहीं भागांना विजेच्या पंपाच्या साह्यानें पाणीपुरवठा करण्यांत येणार आहे.

---

**मध्य प्रदेशांतील विडीचे कारखाने** मध्य प्रदेशांतील विडी तयार करण्याचे कारखाने बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे कारखान्यांना लागणारी तंबाखूचीं पानें गुजरातमधून येतात. पण पानें आणण्यासाठी गेल्या कांहीं दिवसांत रेल्वे-अधिकाऱ्यांकडून एकहि वॅगन न मिळाल्यामुळें ही परिस्थिति उद्भवली आहे.

**रेडिओ-टेलिग्राफचें दळणवळण**—भारत व पोलंड ह्यांच्या दरम्यान रेडिओ टेलिग्राफनें दळणवळण करण्याची व्यवस्था सुरू झाली आहे. गेल्या चार महिन्यांत सुरू करण्यांत आलेला हा चौथा रेडिओ-टेलिग्राफ आहे. आतांपर्यंत भारतानें १२ देशांशीं अशा प्रकारचें दळणवळण सुरू केलें आहे.

**भावनगर येथें सिमेंटचा कारखाना**—सौराष्ट्रांत भावनगर येथें सिमेंटचा नवा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी १·२५ कोटी रुपयांचें भांडवल लागेल आणि त्यांत दररोज ५०० टन सिमेंट तयार होईल. कारखाना निघाल्यानंतर सुमारें १,००० कामगारांना रोजगार मिळेल.

## THE CO-OPERATIVE TRAINING COLLEGE, POONA

Result of the Examination for the Higher Deploma in Co-operation held in April 1955.

62 appeared, 56 passed; percentage of passing 90%

(In order of merit)

### First Class

Garg G. L. Acharya S. M. Belsare N. M. Thakar S. K. Shukla S. G. Dharmadhikari P. P. Shah A. K. Deobhakta N. N. Pandit R. K. Chinmulgund V. K. Patil B. K. Mehta G. K. Hathi P. V. Trivedi I. H. Bhalode V. V.

### Second Class

Tembe D. G. Thalnerkar G. R. Kulkarni D. V. Pathak P. N. Kulkarni P. H. Kanwar J. C. Moghe V. S. Shah S. C. Mulay R. S. Singh Y. Gopal Patel H. O. Joshi H. K. Desai R. P. Mahashabde J. B. Mirza M. M. Sinha S. M. Shukla R. A. Dube S. D. Siddheshwar S. G. Dutt N. C. Singh Gopal Mohan Dave P. A. Nalwade L. B. Ansari A. A. Nadgir V. S. Vasawada J. K. Naidu C. R. Golwalkar G. S. Mahendrakar R. N. Kaushik S. K. Singh A. Brajchanda.

### Pass Class

Desai Y. B. Bhosale V. Y. Rajput G. C. Tambwekar V. S. Salunkhe J. R. Inamdar M. N. Vaidya U. M. Phadke B. G. Suryanarayan Murthy Bhatt S. G.

### Prizes

| Institution which has *instituted the prize* | Amount of prize *Rs.* | To whom *awarded* |
|---|---|---|
| (1) Bombay State Co-operative Bank Ltd. | 100 | Shri Garg G. L. |
| (2) State Industrial Co-operative Association Ltd., Bombay | 50 | Shri Kanwar J. C. |

5, B. J. Road, Poona—1
Dated 22nd June 1955.

Sd/- K. R. Kulkarni,
Principal & Secretary,
Co-operative Training College Committee.

---

## दि डेक्कन बँक्स असोसिएशनचा उपक्रम

### स्टडी सर्कलची स्थापना

दि डेक्कन बँक्स असोसिएशननें इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या सी. ए. आय.आय. बी. परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचें मार्गदर्शन करण्याकरितां जुलै, १९५५ च्या पहिल्या आठवड्यांत 'स्टडी सर्कल' सुरू करण्याचें ठरविलें आहे. भारत इंडस्ट्रिअल बँकेच्या इमारतीच्या सर्वांत वरच्या मजल्यावर सर्कलची कचेरी व सर्कलची जागा राहील. सर्कलच्या सभेच्या तारखा व वेळा असोसिएशनचे ऑनररी सेक्रेटरी हे ठरवितील. प्रवेश फी व इतर चार्जेस डेक्कन बँक्स असोसिएशन ठरवील. तूर्त प्रवेश फी ५० रु. राहील; इतर कोणतीहि फी आकारली जाणार नाहीं. स्टडी सर्कलमध्यें प्रवेश इच्छिणारांनीं असोसिएशनकडे अर्ज पाठवावा. अर्जदार बँकेचा नोकर असल्याचा, बँक अधिकाऱ्याचा दाखला अर्जास जोडला पाहिजे. सर्कलमधील चर्चा, व्याख्यानें, इत्यादींची व्यवस्था असोसिएशन मार्फत ऑनररी सेक्रेटरी हे पहातील.

### नव्या यंत्रसामुग्रीच्या बाबतींत दशांश पद्धतीचा उपयोग

वजनमापांसाठी दशांश पद्धति अंमलांत आणण्यासाठी नेमलेल्या स्थायी समितीनें दि. २२ जून रोजीं झालेल्या पहिल्या बैठकींत एका तांत्रिक समितीची नेमणूक केली. सरकारी मालकीच्या कारखान्यांतून वापरण्यांत येणारीं सर्व नवीं यंत्रें व सामग्री दशांश पद्धतीवर आधारीत असावी असें समितीनें ठरविलें. इतर व्यापारी संस्थांनींहि हेंच तत्त्व स्वीकारावें अशीं पत्रें मध्यवर्ती व्यापार व उद्योग खातें पाठवील. वजनांमापांचीं सध्यांचीं नांवें योग्य आहेत. परंतु शिक्षण-खात्यानें जर अधिक सोपीं नांवें सुचविलीं तर त्यांचा उपयोग करण्यांत यावा, असें समितीनें वजनांमापांच्या नांवासंबंधांत ठरविलें.

---

### सर हुकुमचंदावर १,२५,००,००० रु. कर-आकारणी

इंदूरचे धनिक व्यापारी सर हुकुमचंद स्वरूपचंद, ह्यांचेवर इन्कमटॅक्सची अनुक्रमें ७७,२४,९७१ रु. व ५८,०५,८६० रु. आकारणी केली आहे. त्याचेवर अपील मुंबई हायकोर्टांत करण्यांत आलें आहे. अपिलाचा निकाल लागेपर्यंत इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनीं करवसुलीची कारवाई करूं नये, असा हायकोर्टानें हुकूम दिला आहे. त्याला एक अट अशी आहे कीं, सर हुकुमचंदांनीं १,२५,००,००० रु. चा जामीन दिला पाहिजे. अगोदर जप्त केलेल्या मिळकतींची किंमत हिशेबांत घेऊन बाकीच्या रकमेची ठराविक मुदतींत हमी देण्यांत आली पाहिजे. नाहींतर, इंजंक्शन रद्द करण्यांत येऊन करवसुलीचा मार्ग मोकळा होईल.

---

### भारत सरकारचें नवें कर्ज

भारत सरकारनें १०० कोटी रुपयांचें नवें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. कर्जावर ३½% दरानें व्याज मिळेल. प्राप्तिकराची माफी नाहीं. ९८ रु. ८ आ. स १०० रु. चा रोखा विकत मिळेल. कर्जाची परतफेड १ जुलै, १९६५ रोजीं होईल. १ जुलै १९५५ ते ५ जुलै १९५५ अखेर कर्जाच्या रकमा (१) रोख, (२) २½% १९५५ चे कर्जरोखे, अथवा (३) ४½% चें १९५५–६० कर्जरोखे ह्या स्वरूपांत स्वीकारल्या जातील.

---

### प्रो. फिंडले शिरास ह्यांचा मृत्यु

गुजरात कॉलेजचे एक माजी प्रिन्सिपॉल, प्रो. फिंडले शिरास, हे रिओ–डि–जानेरो येथें २३ जून रोजीं मृत्यु पावले. आंतरराष्ट्रीय आकडे शास्त्रविषयक एका परिषदेस उपस्थित राहाण्यासाठी ते तेथें गेले होते. फुप्फुसाच्या विकाराचा झटका त्यांना विमानांतच आला व विमानतळावर वैद्यकीय मदत दाखल होण्यापूर्वींच त्यांना मृत्यु आला.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# कूळ कायद्यांत महत्त्वाच्या दुरुस्त्या

## बिलाचा मसुदा प्रसिद्ध झाला

### "१ एप्रिल १९५७ हा जमीन कसणारांचा दिन"

जमीनसुधारणेसंबंधींच्या आपल्या धोरणाच्या अंमलबजावणीस अधिक चालना देण्याच्या दृष्टीनें १९४८ च्या कूळ कायद्यांत दुरुस्ती करण्याच्या प्रश्नाचा सरकार कांहीं दिवसांपासून विचार करीत आहे. समाजवादी धर्तीचा समाज निर्माण करणें हें या धोरणाचें उद्दिष्ट असून पुढील मार्गानें तें साध्य करण्यांत येईल.

(१) दलालांचा वर्ग नष्ट करणें (२) जमिनीचा कबजा ती कसणाऱ्यास मिळवून देणें (३) वैयक्तिक होल्डिंगच्या बाबतींत मर्यादा ठरवून देऊन जमिनींची फेरवाटणी करणें आणि (४) जमीन धारण करणाऱ्यास शक्य तो किफायतशीर क्षेत्र (ईकॉनॉमिक होल्डिंग) मिळेल अशी तजवीज करणें.

जमीनधाऱ्याच्या कांहीं विशिष्ट पद्धति नष्ट करण्यासंबंधींचे कायदे करून सरकारनें पहिलें उद्दिष्ट साध्य केलें आहे. इतर उद्दिष्टें साध्य करण्याच्या दृष्टीनें १९४८ च्या कूळ कायद्यांत या धोरणाचीं ज्याला बीजें म्हणतां येतील अशा तरतुदी केलेल्या असल्या तरी पुरेशा नाहींत आणि त्या सरकारचें जमीन सुधारणेसंबंधींचें धोरण प्रत्यक्षांत आणण्याच्या दृष्टीनें त्या अपुऱ्याच म्हटल्या पाहिजेत.

कूळकायद्यांतील या उणीवा दूर करण्याच्या दृष्टीनें व त्याचप्रमाणें या कायद्याच्या गेल्या कांहीं वर्षांतील अंमलबजावणींत ज्या अडचणी आल्या त्या नाहींशा करण्याच्या दृष्टीनें सरकारनें त्यांत दुरुस्ती करण्याचें ठरविलें असून, दुरुस्ती बिलाचा मसुदा अखेरीस स्वरूपांत तयार करण्यांत आला आहे. मुंबई सरकारच्या गॅझेटांत बिलाचा मसुदा प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

#### बिलांतील महत्त्वाच्या तरतुदी

(१) बिलांत जमीन धारण करण्याबाबत जी कमाल मर्यादा ठेवण्यांत आली आहे तीमुळें सध्यां अस्तित्वांत असलेल्या होल्डिंगला जरी बाध येणार नसला, तरी यापुढें कोणाहि इसमास कबजेदार अथवा कूळ अथवा या दोन्ही नात्यानें ४८ एकरांहून अधिक जिरायती जमीन, अथवा २४ एकरांहून अधिक हंगामी बागायती जमीन अथवा भातजमीन अथवा १२ एकरांहून अधिक बारामाही बागायती जमीन धारण करतां यावयाची नाहीं. कमाल होल्डिंगच्या बाबतींत अशा क्षेत्राचें एका युनिटांत रूपांतर करण्याबाबत योग्य अशी पद्धत घालून देण्यांत आली आहे.

(२) ज्याच्याजवळ किफायतशीर क्षेत्रापेक्षां (इकॉनॉमिक होल्डिंग) कमी जमीन असेल त्याला आपली जमीन किफायतशीर क्षेत्राइतकी करण्याच्या दृष्टीनें जादा जमीन मिळवितां येण्याची तरतूद करण्यांत येईल. तसेंच जमीनमालकाला स्वतः कसण्यासाठीं किंवा बिगर शेतकी कारणासाठीं जमीन हवी असली तरी त्याला कुळाला काढून टाकतां येणार नाहीं अशी तरतूद करून कुळाला संरक्षण देण्यांत येईल. किफायतशीर क्षेत्राचें प्रमाण पुढीलप्रमाणें ठरविण्यांत आलें आहे. जिरायत जमीन असेल तर १६ एकर किंवा हंगामी बागायत किंवा भाताची किंवा तांदुळाची जमीन असेल तर ८ एकर किंवा बारामाही बागायती जमीन असेल तर चार एकर.

(३) जेथें मालक व कूळ यांच्यामधील करारानुसार खंडाचें प्रमाण किमान प्रमाणापेक्षां कमी ठरेल अशीं प्रकरणें सोडून इतर बाबतींत कुळानें द्यावयाचा खंड शेतसाऱ्याच्या दुप्पटीपेक्षां कमी व पांच पटीपेक्षां अधिक असणार नाहीं. मात्र या बाबतींत अट अशी कीं, कुळाला द्यावा लागणारा जमीनमहसूल व लोकल फंड सेस लक्षांत घेऊन कुळावरील एकूण जोखीम त्याच्या जमिनींतील उत्पन्नाच्या किंमतीच्या एक षष्ठांशापेक्षां अधिक असणार नाहीं.

(४) १ एप्रिल १९५७ हा दिवस "जमीन कसणाऱ्याचा दिन" म्हणून समजण्यांत येईल आणि त्या दिवशीं व त्या दिवसापासून पुढें प्रत्येक कुळानें–मग ते कायम असो, संरक्षित असो किंवा अन्य प्रकारचें असो, त्याच्याकडे खंडानें असलेली जमीन मालकाकडून खरेदी केली आहे असें समजण्यांत येईल. मात्र या बाबतींत अट अशी कीं, ती जमीन त्यानें स्वतः कसली पाहिजे आणि त्याच्याकडे असलेली एकूण जमीन कमाल प्रमाणापेक्षां अधिक नसली पाहिजे. कायम कुळाच्या बाबतींत जमिनीच्या खरेदीची किंमत शेतसाऱ्याच्या ३० पटीपेक्षा कमी व १०० पटीपेक्षा जास्त असणार नाहीं, इतर कुळांच्या बाबतींत ही किंमत शेतसाऱ्याच्या ५० पटीपेक्षा कमी आणि २०० पटीपेक्षा जास्त असणार नाहीं. खरेदीची किंमत ठरविणाऱ्या ट्रायब्यूनलच्या निर्णयाबाबत कोणाची कांहीं तक्रार असल्यास त्याला त्या निर्णयावर राज्य-सरकारकडे अपील करतां येईल. खरेदीची किंमत, ती ठरविल्यापासून एका वर्षाच्या आंत एक रकमेनें देतां येईल किंवा जास्तींत जास्त १२ वर्षांत जास्तींत जास्त १० हप्त्यांनीं देतां येईल. मात्र हप्त्यांच्या बाबतींत ४॥ टक्के दरानें सरळ व्याज द्यावें लागेल. तसेंच जेथें जमिनीची किंमत हप्त्यांनीं देण्याची कुळाला परवानगी देण्यांत आली असेल तेथें, कुळानें जमीनमालकास द्यावयाच्या रकमा, ज्या वर्षांत किंमतीचा पहिला हप्ता पडेल त्या वर्षापासून फक्त जमीन-महसूल, आणि इरिगेशन व लोकल फंड सेस एवढ्यापुरताच मर्यादित असतील.

(५) जमीन खरेदी करण्याची कुळाची इच्छा नसेल तर कलेक्टर त्याची कुळवहिवाट बंद करील आणि कुळाला तावडतोब काढून टाकतील. नंतर जमीनमालकाकडे कमाल मर्यादेपेक्षां कमी जमीन असेल तर कुळाकडून घेतलेली अशी जमीन मालकाला परत देतां येऊं शकेल किंवा तेंहि न जमलें तर ज्याच्याकडे कमाल मर्यादेपेक्षां कमी जमीन असेल असा जमीनमालक किंवा अंशतः भूमिहीन इसम किंवा दुसरा कोणताहि शेतकरी याच्याकडे देण्यांत येईल.

(६) जमीन खरेदी करण्याचा हक्क आणि भावी कुळांना व त्याचप्रमाणें विधिवांना व अज्ञान अशा वारसांना अथवा संरक्षण दलांतील इसमाला अथवा मानसिक अगर शारीरिक अपंगत्व असलेल्या इसमाला मिळूं शकेल. मात्र या बाबतींत अट अशी कीं एका वर्षाचे आंत असा इसम सज्ञान झाला पाहिजे. संरक्षण दलांतील इसम सदरहू दलांत राहिला न पाहिजे आणि अपंग माणसाचें अपंगत्व नाहींसें झालें पाहिजे.

(७) कायम कुळाखेरीज इतर कुळांच्या बाबतींत कुळाच्या मृत्यूनंतर त्याचा वारस हा आपोआपच कूळ समजला जाईल. "वारस" या शब्दाची व्याख्या कुळाच्या वंशांतले पुरुष वारस अथवा दत्तक घेतलेला मुलगा अथवा पुन्हां जिनें लग्न केलें नाहीं अशी विधवा स्त्री अथवा यांपैकीं कोणीहि नसल्यास कुळाच्या कुटुंबांत त्याच्याबरोबर राहणारा त्याचा भाऊ अशी करण्यांत आली आहे.

(८) कुळांनीं खरेदी केलेल्या जमिनी खरेदीच्या तारखेपासून पांच वर्षें दुसऱ्याचे नांवें करून देतां यावयाच्या नाहींत.

(९) सहकारी संस्था खेरीजकरून इतर कोणत्याहि व्यापारी अथवा औद्योगिक संस्थेस खंडानें दिलेल्या जमिनींना अथवा कोणाहि इसमास अगर वर उल्लेखिलेल्या संस्थांखेरीज इतर इसमांस उंसाच्या किंवा फळझाडांच्या लागवडीसाठीं खंडानें दिलेल्या जमिनींना कायद्यांतील कांहीं कलमांमधील तरतुदी लागू होणार नाहींत. तथापि अशा जमिनींच्या खंडाबाबत नियम करण्याचा अधिकार सरकारला असेल. तसेंच म्युनिसिपालिटी अथवा कॅन्टोन्मेंट यांच्या हद्दींतील जमिनींना कुळानें जमीन खरेदी करण्यासंबंधींच्या कायद्यांतील कांहीं विशिष्ट तरतुदी लागू होणार नाहींत.

कूळ कायद्याचीं जीं नवीं वैशिष्ट्यें वर सांगितलीं आहेत त्यांखेरीज जमीनदारानें शेतजमीन विकण्यासंबंधीं, पाणीपुरवठ्याच्या साधनांच्या बांधकामासंबंधीं सरकारनें जमिनीची व्यवस्था आपल्याकडे घेण्यासंबंधीं व जमिनीबाबतचे दिवाणी दावे मामलेदाराकडे सुपूर्द करण्यासंबंधीं सध्यांच्या कायद्यांत ज्या तरतुदी आहेत त्यांत सुधारणा करण्यांत आली आहे. सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, शिक्षण संस्था, इस्पितळ अथवा मुंबई सार्वजनिक निधीकायद्याखाली नोंदविण्यांत आलेलें देवस्थान आणि कायद्यानें प्रस्थापित झालेलें विद्यापीठ यांच्याकडून खंडानें घेतलेल्या जमिनी या कायद्याच्या तरतुदींमधून वगळण्यांत आल्या आहेत. तसेंच सरकारनें ज्या जमिनींचा कारभार आपल्याकडे घेतला आहे अशा जमिनीस हा कायदा लागू नाहीं. कायद्यांतील कांहीं व्याख्यांत सुधारणा करण्यांत आली असून "भूमिहीन इसम" "कायम कूळ" वगैरे शब्दांच्या नव्या व्याख्या कायद्यांत समविष्ट करण्यांत आल्या आहेत.

### भारताबाहेर हिंदी बँकांच्या कचेऱ्या

| देश | १९५२ | १९५३ | १९५४ |
|---|---|---|---|
| एडन | — | १ | १ |
| ब्रि. ई. आफ्रिका | — | ४ | ७ |
| बर्मा | ८ | ८ | ९ |
| सिलोन | ३ | ३ | ३ |
| फ्रेंच इंडिया | ३ | ३ | — |
| हॉंग-कॉंग | १ | १ | १ |
| जपान | २ | २ | २ |
| मलाया | १२ | १२ | १२ |
| पाकिस्तान | ९६ | ६७ | ६३ |
| थाइलँड | १ | १ | १ |
| ग्रेट ब्रिटन | २ | ४ | ४ |
| | १२८ | १०६ | १०३ |

अशा रीतीनें, १० परदेशांत हिंदी बँकांच्या १०३ कचेऱ्या आहेत. त्यांपैकीं ९७ कचेऱ्या २४ शेड्यूल्ड बँकांच्या मिळून आहेत. परदेशांत त्यांचेकडे ६९ कोटी रुपयांच्या ठेवी असून त्यांनीं ३५ कोटी रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत.

**धारवाडला खुलें नाट्यगृह**—धारवाड म्युनिसिपालिटीनें शहरांत खुलें नाट्यगृह बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या नाट्यगृहाच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ नुकताच पार पडला. नाट्यगृहाला लागणारी जागा मुंबई सरकारनें दिली असून शिवाय नाट्यगृह बांधण्यासाठीं २५,००० रुपयांची रकमेची देणगीहि दिली आहे.

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी !!

दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा:
ब्रँच सेक्रेटरी.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)
श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. ह. ब. गिरमे (उपाध्यक्ष)
अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,०००
रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह रु. १,००,०००
एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर
बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B., श्री. नी. ना. क्षीरसागर — मॅनेजिंग डायरेक्टर्स.


**पोरबंदर येथें सोडा अॅशचा कारखाना**—पोरबंदर येथें बिर्ला बंधूंनीं सौराष्ट्र केमिकल्स ह्या नांवानें एक रासायनिक कारखाना काढला आहे. कारखान्याचें भांडवल तीन कोटी रुपयांचें असून त्यांत दररोज २०० टन सोडा अॅश तयार होईल. जरूर पडल्यास रोज ४०० टन सोडा अॅश तयार करण्याची यंत्रसामुग्रीहि बसविण्यांत येणार आहे.

**कलकत्ता व उपनगरांतील विजेची वहातूक**—ईस्टर्न रेल्वेनें कलकत्ता व त्याचीं उपनगरें ह्यांच्या दरम्यान विजेच्या गाड्या सुरू करण्याची योजना आखली आहे. योजनेला ४५ कोटी रुपये खर्च येईल आणि नवीन सोयींमुळें प्रवाशाची वहातूक दुप्पट होईल ईस्टर्न रेल्वेच्या वार्षिक उत्पन्नांतहि ९·४ कोटी रुपयांची भर पडेल.

**हुबळी शहराला विजेचा पुरवठा**—हुबळी, धारवाड आणि गदग ह्या तीन शहरांना जोग धरणावर उत्पन्न करण्यांत आलेल्या विजेचा पुरवठा लवकरच करण्यांत येऊं लागेल धरणावर उत्पन्न करण्यांत येणाऱ्या विजेपैकी ११,५०० किलोवॅट वीज म्हैसूरचें सरकार कर्नाटकाला पुरविणार आहे.

**रामायणाची नवी आवृत्ति**—बडोदा विद्यापीठाच्या प्राच्यविद्या विषयक संस्थेचे चालक प्रो. गोविंदलाल भट्ट ह्यांनीं रामायणाची नवीन सटीक आवृत्ति काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं १६,००० हस्तलिखित प्रती मिळविण्यांत आल्या असून फ्रान्समध्यें असलेल्या एका प्रतीची फिल्म कॉपी २५,००० रुपये देऊन आणण्यांत आली आहे.


★ किर्लोस्कर



सेंट्रिफ्युगल पंप

( टाइपः—एन् बी एस्. )

या पंपाची रचना अद्यावत आणि सरस असल्यानें तो अनेक दृष्टींनीं किफायतशीर झाला आहे.

प्रमुख वैशिष्ट्यः— ० बॉलबेअरिंगजना अधिक संरक्षण ० पाइप कनेक्शन न सोडवितां तपासणीसाठीं खोलतां येतो.

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी.

कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १६८ ] दुसरी आवृत्ति [ किं. २॥ रु.

र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, चिं. वि. जोशी, इरावती कर्वे, इंदिराबाई देवधर, इत्यादींचे उत्कृष्ट अभिप्राय.

--गुजराती भाषांतर—

સુખી જીવનની પગદંડી

सर्वत्र मिळतें. स्वतः वाचा, संग्रहीं ठेवा, आणि भेटीदाखल द्या.

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.